# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

संपादकः- राकेश शंकर गोरे

प्रकाशन - मुंबई, एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, पुणे, सातारा, रत्नागिरी

R.N.I. No. MAHMAR/2010/33301

● वर्ष : ९ ● अंक: २ ● पृष्ठ: ४ ● मुंबई, मंगळवार १० एप्रिल २०१८ ते सोमवार १६ एप्रिल २०१८

मूल्य २/- रुपये

Website:maharashatracrimetimes.com Email-maharashtracrimetimes33301@gmail.com POSTAL REGISTRATION NO. MCN/157/2017-2019



3 मुंबई विद्यापीठाच्या ३० परीक्षा पुढे ढकलल्या

लैंगिक अत्याचाराबद्दल चौघांना जन्मठेप 4


# शिवसेनेच्या वाघाला गोंजारणे आता शक्य नाही

## अमित शाहांच्या युतीच्या संकेतावर उद्धव ठाकरेंचं उत्तर



**मुंबई (विशाल कारंडे)** - २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात भाजपाच्याच नेतृत्वात एनडीएचे सरकार येईल, असा विश्वास व्यक्त करत भाजपा शिवसेनेशी युती करणार असल्याचे संकेत भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष अमित शाह यांनी दिले. भाजपाच्या स्थापना दिनानिमित्त बीकेसी ग्राऊंडवर आयोजित महामेळाव्यात शाह बोलत होते. यानंतर पत्रकारांशी बोलतानाही त्यांनी शिवसेना आमचा मित्र पक्ष राहावी हीच आमची इच्छा असल्याचे सांगितले. यावरुन शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी अमित शाह यांच्यासहीत भाजपावर टीकास्त्र सोडले आहे. ''२०१९चे चित्र पूर्ण वेगळे असेल, पण भाजप अजूनही २०१४ च्या सुवर्णकाळात रमून बसला आहे. भाजपला मित्रांची गरज नाही. ते मजबूत व स्वयंभू आहेत. शिवसेनेने सोबत असावे असे त्या पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षांनी उडत उडत सांगितले आहे. हा सद्विचार त्यांना २०१४ साली सुचला नाही व सत्ता मिळाल्यावरही ते विनय हरवून बसले. त्यांचे बिनपंखांचे विमान ढगात उडाले ते उडतेच आहे. आता उतरवायचे म्हटले तर त्यासाठी जमीन नाही. सुवर्णकाळातील सुवर्ण कौले फुलपूर-गोरखपूरमधून उडून गेल्यावर काही गोष्टी सुचू लागल्या. भाजपने सुवर्णकाळाचे स्वप्न पाहावे. आमच्या त्यांना शुभेच्छा आहेत!''

# बेस्ट प्रवास महागणार

## दरवाढीच्या प्रस्तावाला हिरवा कंदील

**मुंबई (सम्यक कासारे)**- गुरूवार मध्यरात्रीपासून तुमचा बेस्ट प्रवास महागणार आहे. बेस्ट दरवाढीच्या प्रस्तावाला बृहन्मुंबई वाहतूक विभाग हिरवा कंदील देणार आहे. भाडेवाढीबाबतचा कोणताही प्रस्ताव बेस्टकडे आला नसल्याचं बेस्टने सांगितलंय. मात्र आल्यावर गुरूवारपर्यंत बेस्ट भाडेवाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे ११ एप्रिलच्या मध्यरात्रीपासून हा प्रवास महागण्याची शक्यता आहे. चार किलोमीटरच्या पुढच्या टप्प्यांना ही भाडेवाढ लागू असेल. १ रूपया



ते १२ रूपये या दरम्यान विविध टप्प्यांनुसार ही भाडेवाढ असेल. मात्र ० ते ४ किमीपर्यंतच्या टप्प्यासाठी कोणतीही भाडेवाढ नसेल. एसी बसचा प्रवासही ५ रूपयांनी वाढणार आहे. बेस्टन नुकत्याच एसी हायब्रीड बसेस ताफ्यात समाविष्ट केल्या. बोरिवली, ठाणे, मुलुंड, खारघर ते बीकेसी या मार्गावर ही सेवा सुरू आहे... या मार्गावर प्रवास करणा-यांना याचा फटका बसणार आहे. विद्यार्थी पासच्या दरातही वाढ होण्याची शक्यता आहे.

### चारकोप, गोराई परिसरातील लाखो नागरिकांचे

# गॅस पाईप लाइनचे स्वप्न होणार साकार

**मुंबई (सम्यक कासारे)**- गेली कित्येक वर्षे चारकोप गोराई क्लस्टर आणि बंगलो मधील नागरिक महानगर पाईप लाईन गॅस जोडणीच्या प्रतीक्षेत होते. आधीच्या काँग्रेसच्या काळात तत्कालिन खासदारांनी फक्त आश्वासन दिले, मात्र प्रत्यक्ष काहीच केले नाही, पण आपले सरकार आल्यानंतर याबाबत सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. केंद्रीय पेट्रोलियम मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्यापर्यंत हा विषय खासदार गोपाळ शेट्टी यांनी व मी सातत्याने मांडल्यानंतर महानगर गॅसच्या अधिका-यांनीही जलदगतीने कार्यवाही केली आणि चारकोप, गोराई परिसरातील क्लस्टर आणि बंगल्यात राहणा-या हजारो कुटुंबीयांच्या लाखो नागरिकांचे गॅस पाईप लाईनचे अनेक वर्षांचे स्वप्न साकार होऊ शकेल, असेही शिक्षण मंत्री व मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री विनोद तावडे यांनी सांगितले. चारकोप, गोराई येथील क्लस्टर गृहनिर्माण संस्था व बंगले यांना महानगर गॅस पाईपलाईन जोडणीचा भूमिपूजन चारकोप येथील



सेक्टर ६ व गोराई सेक्टर १ येथे शिक्षण मंत्री व मुंबई उपनगर जिल्हयाचे पालकमंत्री विनोद तावडे व खासदार गोपाळ शेट्टी यांच्या प्रमुख उपस्थितीत काल सायंकाळी पार पडला. लोकमतने सर्वप्रथम वृत्त गेल्या शनिवारी ऑनलाईन वर दिल्यानंतर लोकमतची बातमी उत्तर मुंबईसह मुंबईत सोशल मीडियावर बातमी व्हायरल झाली.

# जळगावात अवघ्या १ रुपयात पार पडला विवाह सोहळा

**जळगाव (अभिजीत येरल्लु)**- लग्न म्हटलं की समोर योतो तो खर्चाचा डोंगर... मात्र, प्रत्येकाची खर्च करण्याची ऐपत नसते. त्यामुळे अशा परिवारांसाठी जळगावात सामूहिक विवाह सोहळ्याचं आयोजन करण्यात आलं होतं. वाजतगाजत आलेली नवरदेवांची वरात... मंडपात जमलेली वऱ्हाडाची गर्दी आणि एकाच मंडपात लागलेले १७ जोडप्यांचे विवाह... जळगावात लागलेला हा भव्य सामुहिक विवाह सोहळा. या विवाह सोहळ्याचा थाट पहाता वधू आणि वर पक्षाला वारेमाप



खर्च करावा लागला असेल असं तुम्हाला वाटेल. पण हे लग्न लागलंय अवघ्या एका रुपयात. आश्चर्य वाटेल पण हे खरंय. एक रुपयात लग्न ही संकल्पना जळगावात राबवण्यात आली. जळगावातील मराठा उद्योजक विकास मंडळ आणि अखिल भारतीय क्षत्रिय मराठा महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने या विवाह सोहळ्याचं आयोजन करण्यात आलं. या लग्नसोहळ्यानं आर्थिक विवंचनेत असलेल्या शेतकऱ्यांना मोठा आधार दिलाय. त्यामुळे या सोहळ्याचं राज्यभरात कौतूक होतंय.

# उपोषणापूर्वी काँग्रेस नेत्यांनी खाल्ले 'छोले भटुरे'

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)** - देशभरातील दलितांविरुद्ध सुरू असलेल्या तथाकथित अत्याचारांविरुद्ध सोमवारी काँग्रेसतर्फे देशस्तरीय उपोषण सुरू आहे. काँग्रेस अध्यक्ष राहुल गांधी स्वतः राजघाटावर उपवासाला बसले आहेत. पण, याच दरम्यान एक फोटो व्हायरल होताना दिसत आहे. या फोटोत काँग्रेस नेते अजय माकन, हारुन युसुफ, अरविंदर सिंह लवली हे छोले भटुरे खात आहेत. लवली यांनी हा फोटो खरा असल्याचंही सांगितल्याचं समोर येत



आहे. एका हिंदी वृत्तवाहिनीने दिलेल्या वृत्तानुसार, भाजप नेते हरीश खुराना यांनी हा फोटो ट्विटरवर शेअर केला आहे. काँग्रेस नेत्यांनी लोकांना राजघाटावर उपोषणासाठी बोलावलं आहे पण स्वतः मात्र हॉटेलमध्ये बसून छोले भटुऱ्यांवर ताव मारत आहेत, अशी कॅप्शन दिली आहे. या फोटोमध्ये असलेले काँग्रेस नेता अरविंद सिंह लवली यांनी हा फोटो खरा असल्याचं स्वीकारलं आहे.

# दलित विरोधी भाजपाचा पराभव करणार -राहुल गांधी

**नवी दिल्ली (हिंदुस्थान समाचार)**- काँग्रेस अध्यक्ष राहुल गांधी यांनी राजघाटवर लाक्षणिक उपोषण केल्यानंतर केंद्र सरकारवर निशाणा साधला. भाजपाच्या विचारधारेमुळे आज देशात ही परिस्थिती निर्माण झाली आहे. भाजपाची विचारधारा देशात फुट पाडत असून दलितांना चिरडले जात आहे, असा आरोप केला.



भाजपा दलित विरोधी आहे, असा गंभीर आरोप करत आम्ही त्यांना २०१९ मध्ये पराभूत करू, असा इशाराही दिला. राहुल गांधी यांनी भाजपा सरकार दलित विरोधी असल्याचा आरोप करत एक दिवसाचे लाक्षणिक उपोषण केले होते. उपोषणानंतर राहुल यांनी पत्रकारांशी संवाद साधला. ते म्हणाले, भाजपाची विचारधारा आदिवासी आणि अल्पसंख्याकांना चिरडणारी आहे. आम्ही भाजपाच्या विचारधारेविरोधात उभे आहोत आणि आयुष्यभर यासाठी विरोध करू. आम्ही त्यांना २०१९ मध्ये पराभूत करून दाखवू असा विश्वासही व्यक्त केला. दरम्यान, राहुल गांधी उपोषणस्थळी उशिरा आल्यामुळे मोठी चर्चा रंगली होती. त्यातच काँग्रेसचे काही नेते राजघाटवर छोले-भटुरे खाऊन आल्याचे छायाचित्र समाध्य माध्यमांवर व्हायरल झाले.

# भाजपाची आश्वासने फोल ठरली

## अशोक चव्हाण यांचा आरोप

**परभणी (अमोल गुडेकर)**- काँग्रेसला ६० वर्ष सत्ता दिली, आम्हाला ६० महिने सत्ता द्या असे म्हणणाऱ्या भाजपाने ४८ महिने उलटली तरी आश्वासनाची पूर्तता केली



नाही. अनेक आश्वासने भाजपाची अक्षरशः फोल ठरली आहेत. एकीकडे शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे सत्र चालूच असताना मोठा दिंडोरा पिटवत भाजपाने मुंबईला महामेळावा घेतला. त्यात विरोधी नेत्यांना प्राण्यांची उपमा दिली. हे मानसिक संतुलन बिघडल्याचे लक्षणे आहेत. त्यामुळे भाजपाने दिलगिरी व्यक्त केली पाहिजे, अशी मागणीही माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार अशोक चव्हाण यांनी आज केली.

परभणी येथे उपोषण आंदोलनानंतर घेतलेल्या पत्रकार परिषदेत अशोक चव्हाण बोलत होते. ते पुढे म्हणाले की, भाजपाने गत निवडणुकीच्यावेळी अनेक आश्वासने दिली. यात सुशिक्षीत बेरोजगारांना नोकऱ्या, शेतकऱ्यांना कर्जमाफी आदींसह दिलेली आश्वासने सपशेल फोल ठरली आहे. या उलट जातीयवादाला खतपाणी घातले आहे. यातून सामाजिक उद्रेक होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. भाजपाच्या ७ खासदारांनी मोदी सरकार दलित विरोधी असल्याचे ओरडून सांगीतले आहे. विरोधी पक्षातील वरिष्ठ नेत्यांना प्राण्यांची उपमा देणे म्हणजे, मानसिक संतुलन बिघडल्याचे लक्षणे आहेत. हा अपमान आम्ही सहन करणार नाही.

### शिक्षकांचा पेपर तपासणीवर बहिष्कार

# पेपरचे गठ्ठे बोर्डात परत पाठवले

**औरंगाबाद (नमिता काळे)**- राज्यभरातील माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षकांनी यंदाही पेपर तपासणीवर बहिष्कार टाकलाय, त्यामुळे औरंगाबाद बोर्डाची अडचण झालीय. औरंगाबाद बोर्डातून तपासणीसाठी पाठवण्यात आलेले तब्बल ७४६ पेपरचे गठ्ठे परत आलेत. दुसरीकडे विनाअनुदानित आणि स्वायत्त तत्त्वावरील महाविद्यालयातील प्राध्यापकांनी बारावीच्या उत्तरपत्रिका तपासणीसाठी नेलेल्या नाहीत. त्यामुळे आता २५२ प्राचार्यांना बोर्डाने नोटीसा पाठवल्या आहेत. औरंगाबाद बोर्डाने मान्यता रद्द करण्याची तंबी दिली असली तरी शिक्षक मागे हटायला तयार नाहीत.



विनाअनुदानित तत्त्वावरील शिक्षकांनी मुंबई, पुणे, नागपूर इथं आंदोलने केली होती. त्यानंतरही सरकारकडून अनुदान याद्या जाहीर करून त्याची तरतूद केली गेली नाही, शिवाय शंभर टक्के अनुदानही देत नाही, त्यामुळे पेपर तपासणीवर बहिष्कार टाकण्यात आला.

# अहमदनगर लवकरच पर्यटन जिल्हा

**शिर्डी (सुनील आव्हाड)**- संतांची भूमी अशी नगर जिल्ह्याची ओळख आहे. त्यामुळे या जिल्ह्यात पर्यटनाला मोठा वाव आहे. जिल्हा 'पर्यटन सर्कलशी जोडून संपूर्ण जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून लवकरच घोषित केला जाणार आहे. टुरिझम सर्कल खाली केंद्र सरकारने नगर जिल्ह्याचा समावेश करावा असा प्रस्ताव पाठविला होता. हा प्रस्ताव मंजुरीच्या अंतिम टप्प्यात आहे. संपूर्ण नगर जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून लवकरच केंद्र सरकारकडून मंजुरी मिळेल. पर्यटन विकासाठी केंद्राचा निधी उपलब्ध होईल, अशी माहिती जलसंधारण मंत्री आणि जिल्ह्याचे पालक मंत्री प्रा. राम शिंदे यांनी दिली. साईबाबांच्या दर्शनासाठी शिर्डीची वारी करणाऱ्या भाविकांसाठी मालपाणी उद्योग समूहाने शंभर कोटी रुपये खर्च करून सहा एकरावर 'साईतीर्थ हा मेगा थीमपार्क उभारला आहे. ऐनवेळी मुख्यमंत्र्यांचा दौरा रद्द झाल्याने पालक मंत्री प्रा. राम शिंदे यांच्या हस्ते या प्रकल्पाचे उदघाटन उरकण्यात आले. शिर्डीच्या साई तीर्थ थीम पार्कला अध्यातमाची जोड दिली असल्याने जीएसटीमधून वगळण्यासाठी सरकारकडे प्रयत्न करू, असं आश्वासन शिंदे यांनी यावेळी दिलं.

## सौजन्य व्हॉट्सअप






# भाजपा आमदार शिवाजी कर्डिलेंना अटक

## दोन शिवसैनिकांच्या हत्येचं प्रकरण

**अहमदनगर (विकास नालुगडे)**- अहमदनगर मधल्या पोटनिवडणुकी दरम्यान शनिवारी शिवसेनेचे शहर उपप्रमुख संजय कोतकर व शिवसैनिक वसंत ठुबे यांची हत्या करण्यात आली. त्यानंतर पोलीस अधीक्षक कार्यालयाची तोडफोड करण्यात आली. पोलीस अधीक्षक कार्यालय तोडफोड प्रकरणी भाजपा आमदार शिवाजी कर्डिले यांना अटक करण्यात आली आहे. यापूर्वी हत्येप्रकरणी राष्ट्रवादीचे आमदार संग्राम जगताप यांच्यासह चौघांना अटक करण्यात आली आहे. कर्डिले हे आमदार जगताप यांचे सासरे आहेत. राजकीय वैमनस्यातून दोन शिवसैनिकांची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती.

मात्र, पोलीस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, कार्डिले यांची अटक केवळ तोडफोड प्रकरणाशी संबंधित असून त्याचा हत्या प्रकरणाशी काहीही संबंध नाहीये. दोन शिवसेनेच्या दोन पदाधिकाऱ्यांची हत्या झाल्यानंतर आमदार शिवाजी कार्डिले, माजी आमदार दादाभाऊ कळमकर आणि माजी महापौर अभिषेक कळमकर यांच्यासह २५० ते ३०० कार्यकर्त्यांनी पोलीस अधीक्षक कार्यालयाची तोडफोड केली होती. त्यामुळे केडगाव पोलीस ठाण्यात या सर्वांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले होते. त्यापैकी २२ जणांना काल अटक करण्यात आली होती. इतर फरार आरोपींचा पोलीस शोध घेत आहेत. पोलिसांनी याप्रकरणी आज शिवाजी कार्डिले यांना आधी ताब्यात घेतले आणि नंतर त्यांना अटक केली.

शनिवारी अहमदनगरमधल्या केडगाव प्रभाग क्रमांक ३२ मधल्या पोटनिवडणुकी दरम्यान हा रक्तरंजित प्रकार घडला. शिवसेनेचे उपशहर प्रमुख संजय कोतकर आणि कार्यकर्ते वसंत ठुबे शनिवारी सुवर्णनगर परिसरात एकत्र होते. यावेळी त्यांच्यावर गोळीबार करुन गुप्तीनेही वार करण्यात आले. या हत्याकांडानंतर जमावानं दगडफेक करुन वाहनांची मोडतोड केली. त्यामुळे केडगावात तणावाचं वातावरण निर्माण झालं होतं. व्यापाऱ्यांनी दुकानं बंद केली. पोलिसांची जादा कुमक तैनात करण्यात आली आहे. हत्येच्या घटनेनंतर अहमदनगर शहरात तणावपूर्ण शांतता आहे. शिवसेनेने रविवारी जिल्हा बंद पाळला.

# बलात्कार तक्रारीला विलंब म्हणजे खोटेपणा नव्हे!

**मुंबई (अमोल गुडेकर)** - बलात्काराच्या घटनेबद्दल पोलिसांत तक्रार देण्यात पीडितेने विलंब केला किंवा दिरंगाई केली याचा अर्थ ती खोटे बोलत आहे, असा होत नाही, असे निरीक्षण मुंबई उच्च न्यायालयाने नुकतेच नोंदवले. सामूहिक बलात्काराच्या प्रकरणात नाशिकमधील चौघांना देण्यात आलेली शिक्षा योग्य ठरवताना उच्च न्यायालयाने आपल्या निकालात हे निरीक्षण नोंदवले.



१५ मार्च २०१२ रोजी पीडित महिला ही मित्रासोबत त्र्यंबकेश्वरहून परतत असताना दत्तात्रय कोरडे, गणेश परदेशी, पिंटू खोसकर व गणेश झोळे या चौघांनी दोघांना हटकले होते. त्यानंतर मित्राला मारहाण करून या चौघांनी महिलेवर बलात्कार केला होता. याप्रकरणी खटला चालल्यानंतर नाशिक सत्र न्यायालयाने चौघांना दोषी ठरवत दहा वर्षांच्या सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली होती. त्याविरुद्ध या चौघांनी अपिल केले होते. 'पीडितेला मित्रासोबत आक्षेपार्ह स्थितीत पाहिल्यानंतर पोलिसांत जाण्याचा इशारा दिल्याने आम्हाला या खोट्या प्रकरणात गोवण्यात आले. तसेच, वैद्यकीय तपासणीत पीडितेच्या शरीरावर जखमेच्या कोणत्याही खुणा आढळल्या नसल्याने बलात्काराचा प्रकार सिद्ध होत नाही', असा दावा दोषींच्या वतीने करण्यात आला. मात्र, न्या. ए. एम. बदर यांनी तो ग्राह्य धरला नाही.

## संपादकीय..

संपादक:- राकेश शंकर गोरे

# व्यापार युद्धाच्या जागतिक झळा!

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चिनी मालाच्या आयातीवर मोठ्या प्रमाणात शुल्कवाढ करून व्यापार युद्धाची सुरुवात केली. त्यावरील चीनची तत्काळ प्रतिक्रिया सौम्य असली तरी आता अमेरिकेतून आयात होणाऱ्या शंभरहून अधिक वस्तूंवरील आयात शुल्क वाढवून व्यापार युद्धाच्या तीव्रतेत भर घातली आहे. अमेरिकेने त्यात भर घालत आता १३०० पेक्षा अधिक वस्तूंवर पंचवीस टक्क्यांनी आयात शुल्क वाढवून व्यापार युद्ध तीव्र केले आहे. यातून निर्माण होऊ शकणाऱ्या व्यापार पेचाला तोंड देण्यासाठी सर्वांनाच आपापल्या व्यापारनीतीची फेररचना करावी लागणार आहे. त्याच वेळीस जागतिक व्यापार संघटनेच्या न्यायालयातही धाव घेण्याची तयारी सुरू आहे. अमेरिकेने अंगीकारलेले संरक्षण धोरण जागतिक व्यापारविश्वासाठी धोक्याचे बनणार असल्याने जागतिक व्यापार संघटना याबाबतीत सकारात्मक निकाल देईल अशी आशा अनेक अर्थतज्ज्ञांना असली तरी ही प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत व्हायचे ते नुकसान होऊन जाईल आणि ते भरून काढायला जागतिक अर्थव्यवस्थांना बराच काळ लागेल असे सध्याचे चित्र आहे. मात्र अमेरिकेने आधीच चीनच्या विरोधात बौद्धिक स्वामित्व अधिकारांच्या उल्लंघनाबद्दल तक्रार दाखल केली आहे.

अमेरिकन मालाच्या आयातीवर असे निर्बंध घालत असताना चीनने अन्य पर्यायही आजमावायला सुरुवात केली आहे. उदाहरणार्थ -अमेरिकेतून बोइंग आयात करण्यापेक्षा युरोपमधून एअर बस आयात करण्याचा पर्याय त्यांना खुला आहे. त्याच वेळी सोयाबीन, मका आणि मांसाची आयात अन्य देशांतून करण्याचीही योजना चीनने आखली आहे. याचा फायदा भारतासह आस्ट्रेलियालाही होऊ शकेल, पण या व्यापार युद्धात शुल्क वाढीचे लोण अन्य देशांतही पसरू लागण्याची शक्यता दिसत असल्याने हे पर्याय किती काळ टिकाव धरू शकतील ही शंकाच आहे. आज जगात कोणालाही आपापल्या बाजारपेठा संरक्षित ठेवणे परवडणारे नाही, हे वास्तव असले तरी ट्रम्प यांचे धोरण आत्मघातकी ठरण्याच्या दिशेने वाटचाल करू लागले आहे.

अमेरिकेने स्टीलवर २५% तर ॲल्युमिनियमवर १०% केलेली सरसकट आयात शुल्कवाढ ही सर्वात जास्त चिंतेची मानली जाते. कारण या शुल्काचा फटका एकट्या चीनलाच नव्हे तर भारतासहित इंग्लंड, कॅनडा, व ब्राझीलसारख्या देशांनाही बसणार आहे. कारण ही शुल्कवाढ सरसकट आहे. भारतातून अमेरिकेला दरवर्षी जवळपास नऊ लाख टन स्टील, तर एक लाख टन ॲल्युमिनियम निर्यात केले जाते. जागतिक स्टील व ॲल्युमिनियम व्यापारात भारताचे स्थान तसे शक्तिशाली नसले तरी भारताला जागतिक बाजारपेठेत आपल्या किमती आता स्पर्धात्मक ठेवणे जड जाणार आहे. अमेरिकेचे संरक्षणात्मक धोरण असेच चालू राहिले तर भारताची निर्यातच संकटात येईल अशी भीती व्यक्त करण्यात येत आहे. कारण अन्य लोह उत्पादक राष्ट्रे आपला अतिरिक्त माल भारतात डम्प करण्याचा व भारतीय उद्योग संकटात आणण्याचा सर्वात मोठा धोका समोर उभा ठाकलेला आहे. याची प्रतिक्रिया म्हणून भारतालाही अनेक वस्तूंवरील आपले आयात शुल्क वाढवावे लागेल आणि नेमका हाच व्यापार युद्धाचा धोका आहे. कारण विद्यमान अर्थव्यवस्थेचे चक्रच यामुळे ठप्प होण्याची शक्यता आहे.



भारत-अमेरिकेतही आयात शुल्काबद्दल विवाद झालेलाच आहे. भारताने अमेरिकेतून आयात होणाऱ्या मोटारसायकल्सवर ७०% एवढे शुल्क ठेवले होते. ते कमी करण्यासाठी ट्रम्प यांनी भारतावर दबावही आणला होता. भारताने हे शुल्क ५०% पर्यंत खाली आणण्याची तयारी दाखवली असली तरी ट्रम्प त्यावर खुश नाहीत. भारतात हार्ले-डेव्हिडसनचे दोन कारखाने आहेत. हे कारखानेच बंद करण्याचा निर्णय अमेरिका कधीही घेऊ शकते. भारताने अमेरिकेतून आयात वाढवावी व व्यापारातील तूट कमी करावी यासाठीही अमेरिका भारतावर दबाव आणतच आहे. भारताला उभयपक्षी व्यापार लाभदायक व्हावा यासाठी जरी हा दबाव मान्य केला असला तरी हे येथेच थांबेल असे नाही. भारतही या व्यापार युद्धात अडकला आहे तो असा.

इकडे युरोपियन युनियनने अमेरिकेच्या शुल्कवाढीला प्रत्युत्तर म्हणून अमेरिकेतून आयात होणाऱ्या जीन्सपासून ते मोटारसायकल्ससारख्या अनेक वस्तूंवर आयात शुल्क वाढवले आहे. म्हणजेच या वस्तू आता युरोपमध्ये महाग होतील. युरोपियन उद्योग आणि तेथील रोजगार संकटात येत असताना आम्ही गप्प राहू शकत नाही अशी युनियनची स्पष्ट भूमिका आहे. त्यासाठी स्टीलसहितच्या अनेक उत्पादनांच्या आयातीवर युरोपियन युनियन बंधने आणू शकते. याचे कारण म्हणजे एरवी जो माल अमेरिकेत गेला असता तो आता युरोपियन युनियनमध्ये डम्प होण्याची धास्ती युनियनला सतावते आहे. त्यामुळे त्यांनीही जागतिक व्यापार संघटनेच्या न्यायालयाचे दरवाजे ठोठावण्याची तयारी सुरू केली आहे. भारताला या व्यापार युद्धाचा त्यातल्या त्यात होऊ शकणारा फायदा म्हणजे चीनला होणाऱ्या कापूस आणि सोयाबीनच्या निर्यातीत होऊ शकणारी वाढ. सध्या चीन अमेरिकेतून या उत्पादनांची आयात करत होता, पण चीनने त्यावरही आयात शुल्क वाढवल्याने पर्यायी पुरवठादार म्हणून भारताचा हा व्यापार वाढू शकतो. परंतु सर्वच देशांनी आपापल्या बाजारपेठा संरक्षित करण्यासाठी आयात शुल्क वाढवत नेले तर जागतिक महागाईचा भडका उडायला वेळ लागणार नाही व याचा सर्वात मोठा फटका सर्वसामान्य ग्राहकांनाच बसणार आहे.

# नुसत्या लोकपालाने काय होणार?

उच्चपदस्थ व्यक्तींचा भ्रष्टाचार हा खूप गाजतो. परंतु, सामान्य माणसाला पावलोपावली जो भ्रष्टाचाराचा सामना करावा लागतो, त्याचे काय? कोणत्याही सरकारी कामासाठी कार्यालयात जा, विनापैशाने काम झाले तर आश्चर्य वाटेल. मोठे विषय मोठ्या बातम्या तयार करतात. सामान्य माणसाच्या पदरात त्यातून काही पडत नाही. अण्णांनी सामान्य माणसाच्या पदरात काही पाडण्यासाठी आंदोलन केले पाहिजे. समाजाचा नैतिक स्तर वाढेल या प्रकारचे वातावरण निर्माण केले पाहिजे. तेच भ्रष्टाचारविरोधाचे उत्तम कवच आहे.

मोठा गाजावाजा करून सुरू झालेले अण्णा हजारे यांचे उपोषण तेवढाच गाजावाजा होऊन सात दिवसांनी संपले. या उपोषणाने अण्णांचे शारीरिक वजन घटले, परंतु नैतिक वजन वाढले का? आपल्या देशात नि:स्वार्थ भावनेने देशकार्य करणारी जी काही थोडी बहुत मंडळी आहेत, त्यात अण्णा हजारे यांचा क्रमांक फार वरचा लागतो. स्वत:च्या स्वार्थासाठी अण्णा काही करत नाहीत. त्यामुळे त्यांच्या कार्याचे नैतिक बळ फार मोठे असते. राजकारणी नेते सर्व काही सत्तेसाठी करत असतात. त्यामुळे लोकांचा त्यांच्यावर मर्यादित विश्वास असतो. देशाची नैतिक शक्तीच राजकारणी मंडळींना योग्य मार्गावर ठेवील, असा जनतेचा विश्वास असतो. हा विश्वास महात्मा गांधी यांनी स्वत:च्या उज्ज्वल चारित्र्याने निर्माण केला. उपोषण आणि सत्याग्रह ही दोन अस्त्रे महात्मा गांधींनी देशाला दिलेली आहेत. अण्णा हजारे महात्मा गांधींच्या पावलावर पाऊल ठेवून वाटचाल करताना दिसतात. नुकत्याच संपलेल्या उपोषणामुळे अण्णा हजारे यांची नैतिक उंची जशी वाढली नाही, तशी ती कमीदेखील झालेली नाही. लोकपाल विषयासाठी २०११ मध्ये त्यांनी असेच आंदोलन केले होते. तेव्हा सारा देश त्यांच्या मागे उभा राहिला. लोकांनी उत्स्फूर्तपणे चौकाचौकात सभा घेतल्या. त्यात तरुण मोठ्या संख्येने सामील झाले. देशाच्या नैतिक शक्तीचे हे जागरण होते. या उपोषणाच्या काळात २०११ चा प्रतिसाद अण्णांना लाभला नाही. एक तर नरेंद्र मोदी सरकारविरोधात भ्रष्टाचाराचा आरोप करता येईल, असे कोणतेही मोठे प्रकरण समोर आलेले नाही. नरेंद्र मोदी म्हणतात की, मी पैसा खात नाही आणि कोणाला खाऊ देणार




नाही. सरकारचे व्यवहार जेवढे पारदर्शक करता येतील तेवढे करण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला आहे. मोदी भ्रष्टाचारी आहेत, असे कोणी म्हणू शकत नाही. त्यामुळे जनतेच्या दृष्टीने भ्रष्टाचाराचा मुद्दा २०११ प्रमाणे ज्वलंत नव्हता. कोणतेही आंदोलन एकाच प्रश्नासाठी वारंवार करता येत नाही. पहिल्यांदा लोकांचा उत्साह असतो. नंतर त्याची पुनरावृत्ती होत राहिल्यास ‘रोज मरे, त्याला कोण रडे’ अशी अवस्था होते. रामलीला मैदानावर अण्णांच्या आंदोलनात जनता फार उत्साहाने उतरली नाही. वर्तमानपत्रांना नकारात्मक बातम्या हव्या असतात. आंदोलकांची उपस्थिती कमी याची बातमी सातत्याने दाखवली गेली.

# शब्दकोडे क्रमांक-२



**आडवे शब्द**

१. वाईट काळात माणसाची वाईट गोष्टींकडे अधिक प्रवृती होते याअर्थी वाक्प्रचार ६. सुताराचे हत्यार १०. वेदना ११. वटवट १२. नुसताच बडबड करणारा १३. हिंदुस्थान १४. योग्य, उचित १६. कप्पा, खण १८. ’अखेरचे येतील माझ्या हेच शब्द ओठी’ -- चुका असतील केल्या, केली पण प्रीती’ (अरूण दाते) २१. प्रेम, आपुलकी २२. मनात घुसलेला आळस २४. आजच्या आधीचा दिवस २५. करांगुली २६. पर्ण २७. बंगाल २८. घाव, प्रहार २९. तांदळाची एक जात ३१. तांदूळाचे पीक ३३. नोकर ३५. न थांबता, अखंडपणे ३७. कारखान्यातील मजूर ३८. पेटलेला कोळसा ३९. निखळ सौंदर्य ४०. सदोदित ४१. फक्त, केवळ ४२. घरातील भांडण ४५. तांबड्या रंगाचे औषधी लाकूड ४८. शरीर ४९. उगाच ५१. खंदक ५३. जागा बदलणे ५६. शुभ्र पांढरे, स्वच्छ ५७. सुंदर तरुणी ५८. भीती ५९. चकाकणारे ६१. सारखा, सम ६२. नातेवाईक ६३. लाज ६४. चटकन, त्वरित ६६. मगज ६८. देशाचे नाणे ७१. मृत्यूदेवता ७२. दुर्लक्ष करणे (वाक्य प्रचार) ७४. मलईची बासुंदी ७५. शहर, गाव ७६. चांदी

**उभे शब्द**

१. संकटात सापडलेल्या माणसाला छोटीशी मदतसुद्धा तारून नेते या अर्थाची म्हण २. गडी माणसे ३. हालचालीवर ठेवलेली नजर ४. ’मधाचे बोट कुणी चाटवा’ म्हणणाऱ्या लावणीतील आजार ५. पूजेचे ताट ६. दफनभूमी ७. पिरपिर करणारा ८. पोळ्यांचा वेगळा, डोशाचा वेगळा ९. हुरहूर, खंत व्यक्त करणे १५. जेव्हा १७. प्रख्यात १९. बत्त्याचा साथीदार २०. ओरिसातील पुरीचा श्रीकृष्ण २१. पायापासून डोक्यापर्यंत २३. उबदार पांघरुण (इंग्रजी) २८. उत्तरधिकारी ३०. संधी ३१. हमाल ३२. मालाची कोठी, साठा ३४. हस्त ३५. अनादर, संकोच ३६. कहाणी ३८. संकट, रोग दूर करणारा ४२. सांसरिक माणूस ४३. तरंग, लाट ४४. हुबेहूब ४६. तरल, अस्थिर मन ४७. किंमत, मूल्य ५०. ब्रह्मदेवाचे जन्मस्थान ५२. नमस्कार ५४. कोल्ह्यासारखा एक प्राणी ५५. होडी ५६. शाळा, प्रशाला ५७. आईचा दादा ५९. झोंबणारे, खरमरीत ६०. पोपट ६१. मंत्रीमंडळ ६२. दूर होणे, बाजूला होणे
६५. उलटी, ओकारी ६६. घसा ६७. तांदळाच्या कण्यांची पेज ६९. मऊ ७०. वेदना, मस्तकशूळ ७३. मस्तक

# थोडक्यात महत्वाचे

## योजनांचा सुकाळ अंमलबजावणीचा दुष्काळ

**नवी मुंबई (राकेश गायकवाड) -** नवी मुंबई महापालिकेच्या समाज विकास विभागांच्या विविध कल्याणकारी योजना लाभार्थीपर्यंत पोहोचतच नसल्याचा आक्षेप स्थायी समितीच्या बैठकीत नगरसेवकांनी घेतला. या योजनांचा लाभ लवकरात लवकर लाभार्थींना मिळवून देण्यात यावा, अशी मागणी करत प्रशासनाच्या उदासीन कारभारावर टीका करण्यात आली. विविध कल्याणकारी योजनांत वस्तू खरेदी करून त्याचे देयक पालिकेला सादर केल्यानंतरच अनुदान खात्यावर जमा होते. त्याला नगरसेवकांनी विरोध केला. ज्या व्यक्तीची आर्थिक स्थिती दुर्बळ आहे, ती व्यक्ती वस्तू खरेदीसाठी खर्च कशी करू शकेल, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला. नियम अटी शिथिल करूनच हा निर्णय लागू करण्याचा प्रस्ताव सभागृहात मंजूर करण्यात आला. विद्यार्थी आणि महिलांसाठीच्या विविध योजना २०१३पासून पूर्णत: बंद असल्याने नगरसेवकांनी नाराजी दर्शवली. अतिरिक आयुक्त अंकुश चव्हाण यांनी सर्व योजना सुरू असल्याचे सांगितले.



## शहरांच्या वेशीवर कचऱ्याचे साम्राज्य

**ठाणे (विनय धाडवे)-** ठाणे जिल्ह्यातील कल्याण, डोंबिवली, अंबरनाथ, बदलापूर या शहरांमध्ये सध्या सर्वत्र स्वच्छता सर्वेक्षणाचे वारे वाहात आहेत. या शहरांतील स्वच्छतेसाठी महापालिका प्रशासन विशेष मोहिमा राबवत असताना शहरांच्या वेशीवर मात्र कचऱ्याचे साम्राज्य दिसून येत आहे. शहरांच्या हद्दीला लागून असलेल्या ग्रामपंचायतींमधून जाणाऱ्या महामार्गाशेजारी कचऱ्याचे ढीग पाहायला मिळत आहेत. काटई नाका ते बदलापूर या महामार्गावर ठिकठिकाणी साठलेल्या कचऱ्यामुळे स्वच्छ भारत अभियानाला हरताळ फासला जात आहे. देशात आणि राज्यात स्वच्छ सर्वेक्षणाच्या माध्यमातून मोठ्या महापालिका, नगरपालिकांच्या स्वच्छतेची तपासणी सुरू आहे. यात सर्वच महापालिका आणि नगरपालिकांतील विविध प्रभागात कचरा वर्गीकरण, प्रक्रिया असे अनेक प्रयोगही राबवले आहेत. मात्र ही स्वच्छता फक्त त्या महानगरांपुरतीच मर्यादित राहिल्याचे चित्र समोर आले आहे. कल्याण-डोंबिवली महापालिका, उल्हासनगर महापालिका आणि अंबरनाथ नगरपालिकेच्या वेशीवर असलेल्या गावांमध्ये मात्र सर्वत्र कचऱ्याचे साम्राज्य पाहायला मिळते आहे.



## नवी मुंबईत फेरीवाल्यांचा सुळसुळाट

**नवी मुंबई (प्रतिनिधी)-** शहरातील फेरीवाला सर्वेक्षण पूर्ण झाले असून दोन्ही फेऱ्यांत मिळून एकूण सात हजार ३२६ फेरीवाल्यांची नोंद करण्यात आली आहे. पालिकेच्या स्थापनेनंतर आजवर केवळ दोन हजार १३८ फेरीवाल्यांनाच परवाने देण्यात आले होते. उर्वरित सर्व फेरीवाले विनापरवाना व्यवसाय करत होते. आता परवान्यासाठी आवश्यक असलेली प्रक्रिया पूर्ण केल्यानंतरच फेरीवाल्यांना परवाना देण्यात येणार असल्याची माहिती पालिकेच्या परवाना विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे. फेरीवाला सर्वेक्षणाला बेलापूर विभागापासून सुरुवात करण्यात आली होती. पहिली फेरी नोव्हेंबरमध्ये तर दुसरी फेरी फेब्रुवारीत सुरू करण्यात आली. पहिल्या फेरीत तीन हजार ७२१ तर दुसऱ्या फेरीत तीन हजार ६०५ अशा एकूण सात हजार ३२६ फेरीवाल्यांचे सर्वेक्षण करण्यात आले. उच्च न्यायालयाने रेल्वे स्थानकापासून १५० मीटपर्यंत फेरीवाल्यांना मनाई केली असूनही नवी मुंबईतील अनेक रेल्वेस्थानकांबाहेर तर कही ठिकाणी स्थानकातच फेरीवाले आहेत.

## टाईमपास

मुलगा : आई एक गरीब माणूस उन्हात ओरडतोय. त्याला थोडे पैसे देऊ?
आई : हो, हे घे पैसे. अरे पण काय ओरडतोय?
मुलगा: आईस्क्रीम, कुल्फी...

◆◆◆

एक चोर रेल्वेच्या डब्यात चढतो आणि एका प्रवाशाला दम देतो. ‘चल काय असेल ते काढ.’
प्रवासी म्हणतो, ‘अरे, मी तिकिटसुद्धा नाही काढलं तर तुला काय देऊ काढून?’

◆◆◆

शिक्षक : अतिपावसाच्या प्रदेशात काय होते?
विद्यार्थी: छत्र्या.
शिक्षक : समजूतदार आणि अडाणी यात फरक काय?
विद्यार्थी : समजूतदार माणूस असले प्रश्न विचारीत नाही.

◆◆◆

वडील : तू कधीतरी कुणापुढे नम्रपणे मान झुकविली आहेस का?
मुलगा : हो, न्हाव्यापुढे कितीतरी वेळा!

◆◆◆

वडील : कष्टाशिवाय काहीही होत येत नाही.
मुलगा : नापास होता येते.

## सुडोकू क्रमांक- २

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 5 | | | | 4 | | |
| | 4 | 8 | 2 | 9 | 5 | | 1 | |
| | | 2 | | | 7 | | 3 | |
| | | | 4 | 5 | | 7 | | 1 |
| | | | 3 | | 9 | | | |
| 8 | | 4 | | 1 | 2 | | | |
| | 5 | | 1 | | | 3 | | |
| | 8 | | 5 | 2 | 6 | 9 | 7 | |
| | | 7 | | | | 1 | | |




**सुविचार**

गरिबी असूनही दान करतो तो खरा दानशूर.

## साप्ताहिक राशिभविष्य

**मेष-** आपले प्रयत्न आज सफल होतील. व्यापारात योग्यवेळी घेतलेला निर्णय फायदेशीर राहील. शिक्षणात यश मिळेल.

**वृषभ-** घरगुती वस्तुंची खरेदी कराल. प्रतिष्ठित व्यक्तींची भेट घडून येईल. फायदेशीर बातम्या ऐकण्यास मिळतील.

**मिथुन-** नातेवाईकांशी असलेल्या संबंधात मर्यादा राखा. व्यापारात नवीन संधी मिळतील. आर्थिक उत्पन्नात वाढ होईल.

**कर्क-** मुलांची प्रगती राहील. धार्मिक कार्यक्रमाच्या समारंभाचे आयोजन कराल. योग्य तऱ्हेने प्रयत्न केल्यास अडकलेला पैसा मिळेल.

**सिंह-** अचानक फायदा मिळण्याचे योग आहेत. नौकरीमध्ये मान सन्मान मिळेल. आप्तजनात मान सन्मान मिळेल.

**कन्या-** परिश्रम केल्याने समस्या दूर होतील. समाधानी राहिल्याने कार्यक्षमतेत वाढ होईल.

**तूळ-** वाद-विवाद संपुष्टात येतील. नौकरी करणाऱ्यांना मनासारखी बढती, बदली होण्याची शक्यता आहे.

**वृश्चिक-** रचनात्मक कामात यश मिळेल. आर्थिक योग उत्तम आहे. कुटुंबातील व्यत्तिंफ्चे सहकार्य घ्या. प्रभावी वातावरणाचा उपयोग होईल.

**धनु-** बौद्धीक अडचणी दूर होतील. प्रगतीचे मार्ग मोकळे होतील. फायदेशीर प्रवास होण्याची शक्यता आहे.

**मकर-** कौटुंबिक समस्यामध्ये लक्ष राहणार नाही. अनिश्चितेमुळे वैचारिक धाडसामध्ये कमतरता राहील.

**कुंभ-** व्यापारातील हेतु साध्य होण्याकरिता अधिक प्रयत्न करावे लागतील. आकर्षक प्रस्ताव आपल्याला येतील.

**मीन-** आपल्या काम वेळेवर न होण्याची शक्यता आहे. आपल्या जीवनसाथीशी वैचारिक मतभेद होण्याची शक्यता आहे.

हे मराठी साप्ताहिक **मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक राकेश गोरे** यांनी सोमानी प्रिंटींग, प्रेस गाला नं. ३-४, अमिन इंडस्ट्रीयल इस्टेट, सोनावाला क्रॉस रोड नं. २,जवाहर नगर फाटक ब्रिज जवळ, गोरेगांव (पूर्व), मुंबई- ४०० ०६३. येथे छापून विष्णू सदन सोसायटी रामचंद्र सुखई सोसायटी नं. १, रूम नं. ४, जयहिंद नगर, खार (पूर्व), मुंबई- ४०० ०५१. येथे प्रकाशित केले. R.N.I. NO. MAHMAR/2010/33301. Mob. 9892631863, 9892632268, 022-69998811, website:maharashatracrimetimes.com,Email-maharashtracrimetimes33301@gmail.com, rakeshgore81@gmail.com **कायदेशीर सल्लागार-** एडवोकेट, हाईकोर्ट मुंबई, डी. के. पांडे (बी.ए.एल.एल.बी.) हा अंक प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख ह्यामधील मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही (मुंबई न्याय कक्षेत)

# मुंबई विद्यापीठाच्या ३० परीक्षा पुढे ढकलल्या

**मुंबई (विशाल कारंडे)-** मुंबई विद्यापीठाच्या भोंगळ कारभारावरुन ते कायमच चर्चेत असते. आता पुन्हा एकदा एका नवीन विषयावरुन विद्यापीठाबाबत चर्चा सुरु झाली आहे. त्याचे कारणही तसेच आहे, विद्यापीठाने तब्बल ३० परीक्षांच्या तारखा पुढे ढकलल्या आहेत. नुकतीच याबाबतची घोषणा करण्यात आली असून यात कॉमर्स, मॅनेजमेंटसह आर्टस शाखेतील विषयांबरोबरच सायन्स आणि कायद्याच्या परीक्षांचा समावेश आहे. विद्यापीठाने आपले सुधारित वेळापत्रक वेबसाईटवर जाहीर केले आहे. याआधी झालेल्या परीक्षांचे निकाल अद्याप लागलेले नसताना पुढील परीक्षांचे वेळापत्रक जाहीर झाल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. इतकेच विद्यापीठाने हा निर्णय घेतला असण्याची शक्यता आहे. यातील काही परीक्षाच्या बदललेल्या तारखा जाहीर करण्यात आल्या असून बाकी परीक्षांच्या नवीन तारखा अद्याप सांगण्यात आलेल्या नाहीत. एमएससी फॉरेन्सिक सायन्स सेमिस्टर-१ची १६ एप्रिलपासून सुरू होणारी परीक्षाही लांबणीवर पडली असून,



ती आता ४ जूनपासून सुरू होईल. बीकॉम (फायनान्शिअल मॅनेजमेंट, सेमिस्टर-५), बीकॉम (अकाऊंट्स अँड फायनान्स) या परीक्षाही पुढे ढकलण्यात आल्या आहेत. तर आर्ट्स शाखेच्या टीवायबीए, एमएच्या परीक्षांसाठीही नवे वेळापत्रक जाहीर केले आहे. तीन दिवसांवर आलेल्या बी. कॉम. ची परीक्षा मे महिन्यात होईल. तर १० एप्रिल रोजी होणारा बीकॉम (फायनान्शियल मॅनेजमेंट सेमिस्टर ५, फायनान्शियल मार्केट्स सेमिस्टर ५, अकाऊंटिंग अँड फायनान्स) चा पेपर आता २ मे रोजी घेतला जाईल, तसेच १६ एप्रिलपासून सुरू होणारी एमएससीची परीक्षा २ जूनपासून सुरू होणार आहे. १८ एप्रिल रोजी होणारी एमएची परीक्षा २१ मे रोजी होईल. १० एप्रिल रोजी होणारी एमएडची परीक्षा १५ मे रोजी होणार आहे.

# नीरव मोदी आणि मेहुल चोक्सीविरोधात अजामीनपात्र अटक वॉरंट जारी

**मुंबई (सम्यक कासारे)- पंजाब नॅशनल बँकेत १३,००० कोटी रुपयांचा घोटाळा करणारा हिरे व्यापारी नीरव मोदी आणि गीतांजली जेम्सचा अध्यक्ष मेहुल चोक्सी यांच्याविरोधात मुंबईतील सीबीआयच्या विशेष न्यायालयाने अजामीनपात्र अटक वॉरंट काढले आहे. यापूर्वी नीरव मोदी आणि मेहुल चोक्सी यांचा भारतीय पासपोर्टही रद्द करण्यात आला आहे.**

या प्रकरणातील नव्या माहितीनुसार, भारताने हाँगकाँगच्या पोलीस अधिकाऱ्यांना पीएनबी घोटाळ्यामधील आरोपी नीरव मोदीला अटक करण्याचे आवाहन केले आहे. नीरव मोदी हाँगकाँगमध्ये लपला असण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. कारण त्याने अलाहाबाद बँकेच्या हाँगकाँग शाखेतून पैसे काढल्याची नोंद झाली आहे. दरम्यान, पंजाब नॅशनल बँकेला चूना लावल्याप्रकरणी नीरव मोदीच्या विरोधात सीबीआयकडून पहिला गुन्हा दाखल झाल्यानंतर हप्त्याभरानंतर नीरवने बेल्जिअमच्या एंटवर्प शहरातील एका



भारतीय सरकारी बँकेच्या शाखेतून मोठी रक्कम काढल्याचे निदर्शनास आले होते. त्यामुळे तो बेल्जिअममध्ये पळून गेल्याचे सांगण्यात येत होते.

केंद्रीय तपास पथकाच्या अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, बँकेतून मोठी रक्कम काढण्याचा हा प्रकार मोठा आश्चर्यकारक आहे. कारण ३१ जानेवारी २०१८ ला भारतीय बँकांच्या सर्व विदेशातील शाखांना या बाबतीत सावधान करण्यात आले होते. सीबीआय सातत्याने परदेशातील भारतीय बँकांच्या अधिकाऱ्यांशी संपर्कात आहेत. नीरव मोदीच्या व्यवहारांवर लक्ष ठेवण्याच्या सूचना त्यांना देण्यात आल्या आहेत.

# मुंबईत अनुसुचित जातींवरील अत्याचाराचे प्रमाण अत्यल्प

**मुंबई (अमोल गुडेकर)-** मुंबई शहर जिल्ह्यात अनुसूचित जातींसाठी असलेल्या योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे होत असून, अनुसूचित जाती उपयोजनेंतर्गत देण्यात आलेला निधी ९९ टक्क्यांपेक्षा जादा खर्च झाला आहे. मुंबईत अनुसुचित जातींवरील अत्याचाराचे प्रमाण अत्यल्प असून, ही बाब समाधानकारक आहे, असे कौतुक केंद्रीय अनुसूचित जाती आयोगाच्या सदस्य डॉ. स्वराज्य विद्वान यांनी शनिवारी पत्रकारांशी बोलताना केले. अनुसूचित जातीसाठी मुंबई शहर जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या योजनांचा आढावा डॉ. विद्वान यांनी मुंबई शहर जिल्हाधिकारी कार्यालयात घेतला. त्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी वरील माहिती



दिली. राष्ट्रीय अनुसूचित जाती-जमाती आयोग आपल्याकडे येणाऱ्या अनुसूचित जातीच्या घटकांच्या तक्रारीच्या अनुषंगाने संबंधितांना न्याय मिळवून देण्याचे काम करते. अनुसूचित जातीच्या घटकांसाठीच्या योजना कशा प्रकारे राबविल्या जातात याचे निरीक्षण करते. मुंबई शहराचा आढावा घेतला असता अनुसूचित जातीच्या घटकांवर अन्याय वा अत्याचाराचे प्रमाण अत्यल्प आहे. केवळ एक हत्या व दोन बलात्कारांच्या घटना समोर आल्या आहेत. याबाबत संबंधित अत्याचारग्रस्तांना आवश्यक ती मदत देण्यात आली आहे, असे डॉ. विद्वान यांनी सांगितले.

सामाजिक न्याय विभागामार्फत राबविण्यात येत असलेली डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वावलंबन योजना प्रशंसनीय आहे. तसेच आंतरजातीय विवाहासाठी २४० दाम्पत्यांना प्रोत्साहनपर प्रतिदाम्पत्य ५० हजार रुपयांचे अनुदान देण्यात आले आहे. कंत्राटी पद्धतीवर कर्मचारी घेताना यामध्ये आरक्षणाचे सूत्र अवलंबले जावे, असेही मत आरक्षणासंदर्भातील प्रश्नाला उत्तर देताना डॉ. विद्वान यांनी व्यक्त केले.

# गिरणी कामगारांच्या मुलांना मिळणार नोकऱ्या



**मुंबई (प्रतिनिधी)-** मुंबईचे वैभव असलेल्या गिरणी उद्योगाची स्मृती जपण्यासाठी काळाचौकी येथे बांधण्यात येणा-या पहिल्या वस्त्रोद्योग संग्रहालयासाठी अखेर सात वर्षांनंतर मुहूर्त सापडला आहे. केंद्र सरकारच्या युनायटेड टेक्सटाईल मिल क्रमांक २ व ३च्या भूखंडांवर हे वस्त्रोद्योग संग्रहालय उभारण्यात येणार आहे. या संग्रहालयाच्या पहिल्या टप्प्याच्या कामाला स्थायी समितीने शनिवारी मंजुरी दिली. या वस्तुसंग्रहालयात गिरणी कामगारांच्या मुलांना रोजगाराची संधी देण्याची सूचनाही मान्य करण्यात आली आहे.

१९८२मध्ये झालेल्या संपामुळे गिरण्या मुंबईतून नामशेष झाल्या. एकेकाळी मुंबईचे वैभव असलेल्या या वस्त्रोद्योगाची स्मृती पुसली जाऊ नये यासाठी काळाचौकी येथे मिलच्या जागेवर संग्रहालय उभारण्याचा निर्णय २०११मध्ये घेण्यात आला होता. मात्र मिलच्या जागेत बदल करण्यास पुरातन वस्तू समितीकडून आक्षेप घेण्यात आला. तसेच या प्रकल्पासाठी खर्च कोण करणार, असा सवालही होताच. याबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीसमोर चर्चेसाठी आला असता राष्ट्रवादीच्या गटनेत्या राखी जाधव यांनी या वस्तुसंग्रहालयात ज्या नोकऱ्या निर्माण होतील त्यात गिरणी कामगारांच्या मुलांना प्राधान्य द्यावे, अशी मागणी केली. ही उपसूचना मान्य करीत एकमताने हा प्रस्ताव मंजूर करण्यात आला.

# ‘रायगडाला आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक बनविणार’

**मुंबई (हर्षद परब)-** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सूचनेनंतर किल्ले रायगडाच्या पुर्ननिर्मितीसाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसही आग्रही आहेत. त्यांच्या प्रयत्नातून स्वराज्याची राजधानी असणाऱ्या किल्ले रायगडाचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारणार असल्याचा संकल्प केंद्र शासनाच्या पुरातत्त्व खात्याने सोडला आहे. रायगड प्राधिकरणाच्या माध्यमातून खात्याचे मुंबई प्रभारी नंबी राजन यांनी महाड येथे झालेल्या पत्रकारांच्या चर्चेदरम्यान ही माहिती दिली. केंद्रीय पुरातत्त्व खात्याच्या यंत्रणेखाली रायगड प्राधिकरणामार्फत सुरू असलेल्या किल्ले रायगडावरील उत्खनना संदर्भात शुक्रवारी रात्री हॉटेल विसावा येथे या खात्याचे क्षेत्रीय निर्देशक नंबी राजन व पुरातत्त्व खात्याचे अधीक्षक नेगी यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी रायगड प्रभारी कांबळे हेही उपस्थित होते.

पुरातत्त्व खात्याच्या इतिहासात शासनामार्फत आजपर्यंत पहिल्यांदाच सुमारे सहाशे कोटी रुपये एवढी भरीव तरतूद करण्यात आली आहे. तसेच ती प्राधिकरणाच्या माध्यमातून किल्ले रायगडच्या निर्मितीसाठी खर्च होणार आहे. अनुभवी तज्ज्ञ मंडळीच्या मार्गदर्शनाखाली अधिक साहित्यांचा वापर करून किल्ले रायगडाचे पुनर्वैभव निर्माण करण्याचा शासनाचा संकल्प असल्याचे नंबी राजन यांनी यावेळी स्पष्ट केले. पुरातत्त्व खात्याच्या कायद्यानुसार किल्ले रायगडावर आजपर्यंत सुरू असलेली कामे यापुढे रायगड प्राधिकरणाच्या माध्यमातून शासनाच्या विविध खात्यांनी एकत्रितपणे करण्याचा निर्णय झाला आहे. यासंदर्भात प्राधिकरणाच्या स्थापनेनंतर कामांना वेग आल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. या कामांमध्ये सार्वजनिक बांधकाम, वीज मंडळ, पाणीपुरवठा, पर्यटन मंडळ आदी विभागांचा समावेश असल्याची माहिती नंबी राजन यांनी दिली.



# मुख्यमंत्र्यांचा हात पवारांच्या जबड्यात!

## भाजपा - राष्ट्रवादीतील संघर्ष तीव्र होणार

**मुंबई (विशाल कारंडे)- ‘चहावाल्याच्या नादी लागाल, तर औषधालाही शिल्लक राहणार नाही,’ अशा शब्दांत आव्हान देत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारच्या भाजपा महामेळाव्यात थेट राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांच्या जबड्यात हात घातला. ‘सत्तेत शिवसेनेबरोबर, पण जवळीक राष्ट्रवादीशी,’ या स्थितीतून बाहेर पडत, थेट पवारांना अंगावर घेण्याची भूमिका मुख्यमंत्र्यांनी जाहीरपणे घेतल्याने, भाजपा-राष्ट्रवादीतील संघर्ष अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.**

महामेळाव्याला प्रचंड गर्दी जमविण्यात भाजपाला मोठे यश मिळाले. मुख्यमंत्री, प्रदेशाध्यक्ष खा. रावसाहेब दानवे व मुंबई अध्यक्ष आशिष शेलार यांच्या चेहऱ्यावर या गर्दीचे समाधान महामेळाव्याच्या वेळी



स्पष्टपणे दिसत होते. कार्यकर्त्यांमध्ये जोश भरला, तो मुख्यमंत्र्यांच्या भाषणाने. महाराष्ट्राच्या राजकारणात पवारांना आव्हान देणारे अनेक नेते संपले वा त्यांनी पवारांशी जुळवून घेतले. आपल्या वयाइतका संसदीय कारकिर्दीचा अनुभव असलेल्या पवारांसमोर मुख्यमंत्र्यांनी जाहीररीत्या दंड थोपटले.

राजकीय खेळींमध्ये निपूर्ण पवारांवर थेट हल्लाबोल करण्याचा अर्थ मुख्यमंत्र्यांना कळतच असणार, तरीही त्यांनी जोखीम पत्करली. एका विशिष्ट काळात गोपीनाथ मुंडे यांनी ती पत्करली आणि युतीची सत्ता पहिल्यांदाच महाराष्ट्रात येण्यास त्यामुळे मोठी मदत झाली होती. मुंडेंचा अपवाद सोडला, तर अगदी पंतप्रधान नरेंद्र मोदी हेही पवारांचे बोट धरून राजकारणात आल्याचे जाहीरपणे सांगणारे. मात्र, एकीकडे पवार आणि संपूर्ण राष्ट्रवादीने भाजपावरील हल्ले तीव्र केलेले असताना, ‘बोट(धरू) चेपेपणाची भूमिका घेऊन चालणार नाही, हे ओळखून मुख्यमंत्र्यांनी बारामतीकरांवर शरसंधान साधले, असे दिसते. मोदींविरोधातील सर्व शक्तींना एकत्रित आणण्यासाठी पवारांनी राष्ट्रीय स्तरावर घेतलेला पुढाकार लक्षात घेऊन, त्यांच्यावर निशाणा साधण्याबाबत मुख्यमंत्र्यांना भाजपाश्रेष्ठींनीही ‘ग्रीन सिग्नल’ दिलेला दिसतो.

सरकारमध्ये शिवसेना सोबत असताना आपले नेते राष्ट्रवादीला गोंजारत असल्याने, भाजपाच्या कार्यकर्त्यांमध्ये असलेली अस्वस्थता उशिरा का होईना, फडणवीस यांनी ओळखली हे बरे झाले. आघाडी सरकारमधील घोटाळ्यांचा विषय केवळ छगन भुजबळांपुरताच मर्यादित राहणार नाही, अशी आता तरी अपेक्षा आहे.

# मुंबई-ठाणेकरांना टोल दिलासा

**मुंबई (सम्यक कासारे)-** मुंब्रा बायपास रस्त्यावरील रेल्वे उड्डाणपुलाच्या दुरुस्तीसाठी या मार्गावरील वाहतूक आनंदनगर चेकनाका- ऐरोलीमार्गे वळविण्यात येणार आहे. त्यामुळे मुंबई-ठाणेकरांना टोलभारमधून दिलासा देण्याच्या हालचाली सरकारने सुरू केल्या असून मुलुंड किंवा ऐरोली यापैकी कोणत्याही एका नाक्यावर टोल भरल्यास दुसऱ्या नाक्यावर टोल भरावा लागणार नाही. त्याबाबतचा शासन निर्णय लवकरच काढण्यात येणार असल्याची माहिती मंत्रालयातील सूत्रांनी दिली.

मुंब्रा बायपास मार्गावर अवजड वाहनांची सतत गर्दी असल्यामुळे मध्य रेल्वेवरील उड्डाणुलास धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे पुलाची दुरुस्ती करण्याचा निर्णय घेण्यात असून दुरुस्तीचे काम येत्या १६ एप्रिलपासून सुरू होणार आहे. त्यामुळे बायपास मार्ग पुढील दोन-तीन महिने बंद राहणार असून या दरम्यानच्या काळात ही वाहतूक ठाण्यातील आनंदनगर-ऐरोलीमार्गे वळविण्यात येणार आहे. परिणामी मुंबई-ठाणेकरांना आनंदनगर टोलनाक्यावरील मोठ्या वाहतूक कोंडीचा सामना करावा



लागणार आहे. ही वाहतूक कोंडी फोडण्यासाठी एमएमआरडीए, सार्वजनिक बांधकाम विभाग, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण तसेच, ठाणे, भिवंडी, कल्याण-डोंबिवली, मुंबई, नवी मुंबई आदी महापालिकांनी त्यांच्या अखत्यारीतील सर्व रस्त्यांची डागडुजी करण्याचे आदेश सार्वजनिक बांधकाममंत्री (सार्वजनिक उपक्रम) एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत.

या मार्गावर लोकांना मुलुंड आणि एरोली या दोन्ही नाक्यांवरील टोलमधून दिलासा मिळणार आहे. याबाबत एकनाथ शिंदे यांच्याशी संपर्क साधला असता, ऐरोली आणि मुलुंड या दोन टोलनाक्यांमधील अंतर कमी असून लोकांना नाहक भुर्दंड पडू यासाठी एका टोलनाक्यावरच टोल भरल्यास दुसऱ्या टोलनाक्यावर सवलत देण्याच्या प्रस्तावावर सरकार लवकर निर्णय घेईल, असे त्यांनी सांगितले.

# शिक्षकांच्या पगाराची अजूनही अडवणूक?

**मुंबई (प्रतिनिधी)-** मुंबईतील शिक्षकांच्या पगाराबाबत न्यायालयीन सोपस्कर पार पडले असले तरी शिक्षण विभागाकडून जाणीवपूर्वक शिक्षकांच्या पगाराची बिले बँकेकडे पाठविली जात नसल्याचा धक्कादायक आरोप शनिवारी शिक्षक आमदार कपिल पाटील यांनी केला. याप्रकरणी पाटील यांनी शिक्षण निरीक्षकांना पत्र पाठवले असून, ही बाब सर्वोच्च न्यायालयाची अवमान करणारी असल्याची टीकाही त्यांनी केली आहे. शिक्षकांचे पगार युनियन बँकेमार्फत करण्याचा निर्णय झालेला असतानाही शिक्षकांच्या एप्रिलच्या वेतनाचे देयक शिक्षण विभागाने ट्रेझरी किंवा बँकेकडे पाठवलेले नाही, असा दावा कपिल पाटील यांनी केला आहे. ट्रेझरीला दरमहिन्याच्या २० तारखेला बिले सादर करणे अनिवार्य असल्याचे पाटील यांनी दिलेल्या निवेदनात स्पष्ट केले आहे.

# 'घटस्फोटाच्या प्रकरणांमध्ये सज्ञान मुलगीही देखभाल खर्च मागण्यास पात्र'

**मुंबई (विशाल कारंडे)- घटस्फोटाच्या प्रकरणांमध्ये मुलगी सज्ञान झाली तरी तिच्या देखभालीचा खर्च वडिलांना द्यावाच लागेल वा ती वडिलांकडून खर्च मिळावा यासाठी दावा करू शकते, असा निर्वाळा उच्च न्यायालयाने दिला आहे. मुलीच्या वतीने तिची आईसुद्धा या देखभाल खर्चासाठी अर्ज करू शकते, असेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे.**

घटस्फोटीत पतीला १९ वर्षांच्या मुलीचा देखभाल खर्च देण्याचे आदेश द्यावेत या मागणीसाठी केलेला अर्ज कुटुंब न्यायालयाने फेटाळून लावल्याने त्याविरोधात मुंबईस्थित महिलेने उच्च न्यायालयात धाव घेतली होती. न्यायमूर्ती भारती डांगरे यांनी मात्र या महिलेचा दावा योग्य ठरवत तिची मागणी मान्य केली.

याचिकाकर्त्या महिलेचा १९८८ साली विवाह झाला होता आणि तिला दोन मुले व एक मुलगी आहे. लग्नाच्या नऊ वर्षांनंतर तिने पतीपासून काडीमोड घेतला. पतीपासून विभक्त झाल्यानंतर तिन्ही मुलांचा ताबा तिला मिळाला



आणि तिन्ही मुले सज्ञान होईपर्यंत प्रत्येक महिन्याला वडील त्यांच्या देखभालीचा खर्च तिला देत असत. मुले सज्ञान झाल्यानंतर मात्र वडिलांनी देखभाल खर्च देणे बंद केले. परंतु मुलगी सज्ञान झाली असली तरी ती उच्च शिक्षण घेत असल्याने अद्यापही आर्थिकदृष्ट्या आपल्यावर अवलंबून आहे. तिच्या शिक्षणाचा खर्च खूप आहे. त्यामुळेच तिच्या वडिलांकडून तिच्या देखभालीचा खर्च प्रत्येक महिन्याला मिळावा, असा दावा या महिलेने केला होता. दुसरे म्हणजे एक मुलगा शिक्षणासाठी घेतलेले कर्ज फेडत आहे, तर दुसऱ्याला अद्यापही नोकरी लागलेली नाही. त्यामुळे दोन्ही मुलांकडून आपल्याला आर्थिक साहाय्य मिळत नाही, असा दावा तिने केला होता. या महिलेला घटस्फोटीत पतीकडून देखभाल खर्च म्हणून महिन्याला २५ हजार रूपये मिळतात. म्हणून मुलीलाही प्रत्येक महिन्याला १५ हजार रूपये खर्च देण्याचे आदेश पतीला द्यावेत, अशी मागणी तिने केली होती. परंतु कायद्यानुसार केवळ अल्पवयीन मुलीलाच देखभाल खर्च देण्याची तरतूद आहे. तसेच सज्ञान मुलगी आपल्या आईमार्फत देखभाल खर्चासाठी दावा करू शकत नाही, असे स्पष्ट करत कुटुंब न्यायालयाने तिचा अर्ज फेटाळून लावला. तर घटस्फोटाच्या प्रकरणांमध्ये सज्ञान वा अविवाहित मुलगीसुद्धा देखभाल खर्च मागू शकते, असा निकाल सर्वोच्च आणि उच्च न्यायालयाने अनेकदा दिलेला आहे. त्यामुळेच या प्रकरणातही सज्ञान मुलगी वडिलांकडून देखभाल खर्च मिळवण्यास पात्र आहे, असे स्पष्ट करत कुटुंब न्यायालयाचा आदेश न्यायालयाने रद्द केला. तसेच याचिकाकर्त्यांचा अर्ज नव्याने ऐकून त्यावर निर्णय देण्याचे आदेशही कुटुंब न्यायालयाला दिले.

डीजीआयपीआर/२०१८-२०१९/७९

# भाजपची अवस्था इकडे आड तिकडे विहीर

**मुंबई (अमोल गुडेकर)-** मूळचे शिवसैनिक असलेले नारायण राणे आणि शिवसेना यांच्यातून विस्तव जात नाही. त्यामुळे नारायण राणे यांना भाजपने जवळ केले तर शिवसेना हा भाजपचा मित्रपक्ष दुखवतो, तर शिवसेनेला भाजपने चुचकारले तर नारायण राणे नाराज होतात, अशा दुहेरी कात्रीत भाजप सापडला आहे. त्यामुळे भाजपची अवस्था 'इकडे आड तिकडे विहीर' अशी झाली आहे. नारायण राणे यांना राज्य मंत्रिमंडळात समावेश करून घेण्यास शिवसेनेने तीव्र विरोध केला. राणे यांना भाजपने मंत्रिमंडळात घेतले तर शिवसेना आपणहून सरकारमधून बाहेर पडेल, असा धमकीवजा इशारा शिवसेनेने भाजपला दिला होता. आपला मंत्रिमंडळ प्रवेश केवळ शिवसेनेच्या तीव्र विरोधामुळे हुकल्याची खंत राणे यांना आहे. त्यामुळे राणे यांना स्वतंत्र पक्ष स्थापन करून भाजपप्रणीत एनडीएत सामील व्हावे लागले. त्यांना इच्छा नसताना भाजपकडून राज्यसभेवर जावे लागले असल्याचे राणे यांचे निकटवर्तीय सांगतात. त्यामुळे राणे हे शिवसेनेला विरोध करणार हे जाहीर आहे; मात्र सध्याचे देशातील राजकीय वातावरण पाहता २०१९ मध्ये केंद्रात भाजपचे सरकार पुन्हा येण्यासाठी भाजपला घटक पक्षांची गरज भासणार असल्याचे चित्र आहे. त्यामुळे शिवसेना हा भाजपचा सर्वांत जुना मित्र असून त्यास मुकणे भाजपला परवडणारे नाही. म्हणून भाजपची मागील काही दिवसांपासून शिवसेनेबाबतची भाषा बदललेली दिसत असल्याचे राजकीय जाणकार मत व्यक्त करतात. त्यामुळे राणे आणि शिवसेना या दोघांना नाराज करणे भाजपला फायद्याचे नाही, याची जाणीव भाजपला आहे. ही कसरत भाजपला करावी लागणार आहे.



# प्रवेशपत्रिकेवर विद्यार्थ्यांच्या ऐवजी छापले अश्लील फोटो

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)-** परीक्षेच्या प्रवेश पत्रिकेवर विद्यार्थ्यांच्या फोटोच्या ऐवजी अश्लील फोटो छापून आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. बिहारमध्ये पुन्हा एकदा शिक्षण विभागाचा बेजबाबदारपणा समोर आला आहे. दरभंगामधील ललित नारायण मिथिला विश्वविद्यालयातील हा प्रकार आहे. हे हॉल तिकीट सध्या सोशल मीडियावर व्हायरल होतं आहे. हा प्रकार तेव्हा समोर आला जेव्हा एका विद्यार्थ्याने इंटरनेटवरुन आपलं प्रवेशपत्र डाऊनलोड केलं. विद्यार्थी एसएमजे कॉलेजच्या तिसऱ्या वर्षात शिकत आहे. ही परीक्षा १० एप्रिल २०१८ पासून सुरु होणार आहे. काही दिवसांपूर्वी गणेशाचा फोटो असलेला प्रवेशपत्र व्हायरल झालं होतं. एका हिंदी वेबसाईटने दिलेल्या माहितीनुसार, ऑनलाईन अर्ज करतांना मिळालेल्या पावतीवर विद्यार्थ्याची सही आणि फोटो बरोबर होता. पण प्रवेशपत्र आलं तेव्हा मात्र त्याच्यावरील फोटो अश्लील होता. या घटनेची माहिती मिळताच एलएनएमयू परीक्षा विभागात एकच खळबळ उडाली. त्यानंतर संबंधित विभाग हरकतीत आला.

# खूशखबर...! खूशखबर...!

# म्हाडा लॉटरीत यंदा मिळणार १००१ घरे



**मुंबई (सम्यक कासारे)- मुंबईकरांना प्रतीक्षा असलेल्या म्हाडाच्या मुंबई मंडळाच्या घरांच्या लॉटरीची तारीख अद्याप जाहीर झालेली नाही. मात्र, घरांची अंतिम संख्या म्हाडाने जाहीर केली असून यंदाच्या लॉटरीत एक हजार एक घरांचा समावेश करण्यात येणार आहे. यंदाच्या लॉटरीतील निम्मी, म्हणजे पाचशे घरे अल्प उत्पन्न गटासाठी राखून ठेवली आहेत, हे यंदाच्या लॉटरीचे वैशिष्ट्य आहे. मुख्य म्हणजे लॉटरी सोहळ्याच्या खर्चात कपात करण्यासाठी वांद्रे येथील म्हाडाच्या मुख्यालयात मंडप उभारून लॉटरी जाहीर करण्याची योजना आहे. त्याशिवाय फेसबुक लाइव्हवर लॉटरीचे थेट प्रक्षेपण होणार आहे.**



म्हाडा घरांची लॉटरी सर्वसाधारणपणे दरवर्षी मे महिन्यात काढली जाते. पण यंदा मे महिन्यात लॉटरी काढली जाण्याची शक्यता कमी आहे. मागील वर्षी १० नोव्हेंबरला लॉटरी काढली होती. त्यावेळी फक्त ८१९ घरांचा लॉटरीत समावेश होता. लॉटरीत सर्वाधिक मागणी अत्यल्प व अल्प उत्पन्न गटातील घरांसाठी असते. मागील वर्षी अत्यल्प उत्पन्न गटासाठी एकाही घराचा लॉटरीत समावेश नसल्याने म्हाडावर खूप टीका झाली होती. यंदा अत्यल्प उत्पन्न गटासाठी २८३ तर अल्प उत्पन्न गटासाठी तब्बल ५०० घरे राखून ठेवली आहे. त्यामुळे गरीब व सर्वसामान्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

म्हाडा लॉटरी दरवर्षी वांद्रे येथील रंगशारदा सभागृहात काढली जाते. यासाठी मंडप, पंखे, टीव्ही स्क्रीन, सुरक्षा व्यवस्था, जेवण यावर मोठी रक्कम खर्च होते. यावर्षीची लॉटरी वांद्रे येथील म्हाडाच्या मुख्यालयात काढण्यात येणार असल्याने खर्चात मोठी कपात होणार आहे. मागील वर्षीप्रमाणे यंदाही फेसबुकवर म्हाडाची लॉटरी लाइव्ह करण्यात असल्याने गर्दी काही होईल, अशी अपेक्षा आहे.

**अल्प उत्पन्न गटासाठी घरे**
पीएमजीपी मानखुर्द - ११४
मुलुंड गव्हाणपाडा- २६९
सायन प्रतीक्षानगर- ८४
गोरेगाव सिद्धार्थनगर- २४
घाटकोपर पंतनगर-२
विक्रोळी टागोरनगर- ७
एकूण घरे -५००

**अत्यल्प उत्पन्न गटासाठी घरे**
वडाळा अँटॉप हिल- २७८
म्हाडा इमारत घरदुरुस्ती मंडळ- ५
एकूण- २८३

**मध्यम उत्पन्न गट**
विक्रोळी कन्नमवार नगर- २८
कांदिवली महावीर नगर- १७२
मानखुर्द- पीएमजीपी १६
एकूण २१६

**उच्च उत्पन्न गट**
घाटकोपर पंतनगर - २

# पराभवाच्या भीतीमुळेच भाजपला युतीची आठवण

**बेलापूर (राकेश गायकवाड)- आगामी काळातील निवडणुका स्वतंत्रपणे लढण्याची भाषा करणाऱ्या भाजपचा आत्मविश्वास डगमगला आहे. अपयशाची भीती वाटल्याने भाजप मेळाव्यात एनडीए एकत्रित निवडणुका लढणार असल्याचे वक्तव्य भाजपचे अध्यक्ष अमित शहा व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. ही टीका शिवसेना नेते व राज्याचे उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनी नेरूळ आगरी कोळी भवन येथे झालेल्या पदाधिकारी व कार्यकर्ता मेळाव्यात केली आहे. आगामी काळातील निवडणुका शिवसेना पक्ष स्वतंत्ररीत्या लढणार असल्याचे शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी याआधीच स्पष्ट केले आहे. याबाबत ठरावही झाला असल्याचे त्यांनी सांगितले.**



शिवसेनेच्या वतीने सिंधुदुर्गपासून पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे मेळावे घेण्यात येत आहेत. नवी मुंबईतील नेरूळ येथील मेळावा त्याचाच एक भाग होता. या वेळी देसाई यांनी भाजपसह इतर पक्षांच्या नेत्यांचा समाचार घेतला. शिवसेना डोळ्यांसमोर निवडणुका ठेवून कधीच काम करीत नाही. नवी मुंबई शहरात शिवसेना वाढविण्याचा सल्ला या वेळी देसाई यांनी पदाधिकारी व कार्यकर्त्यांना दिला. पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनी लोकसभा, विधानसभा यासह पालिकेच्या एकत्रित निवडणुकांनाही शिवसेना तयार असल्याचे सांगितले. शिवसैनिक जिवंत असेपर्यंत ठाण्यामध्ये कोणालाही सत्ता मिळणार नसल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

लोकसभा निवडणुकीत ५० हजार मतांचे मताधिक्य नवी मुंबईतून मिळाले. बेघर होण्याची वेळ आलेल्या दिघ्यातील नागरिकांच्या मदतीला सर्वांत आधी शिवसेनाच मदतीला धावली. नवी मुंबईत शिवसेना कार्यकर्त्यांचा आलेख वाढत आहे.

# हॉर्नचे प्रदूषण रोखण्यासाठी 'नो हॉर्न प्लीज'चा उपक्रम

**कल्याण (प्रतिनिधी)- कल्याण आरटीओ आणि कल्याणमधील विविध रिक्षा संघटना, तसेच मुंबई रिक्षामेन्स युनियन यांच्या संयुक्त विद्यमाने 'नो हॉर्न प्लीज'चा अभिनव उपक्रम हाती घेण्यात आला आहे. वाहनांच्या हॉर्नमुळे होणारे प्रदूषण रोखण्यासाठी हा उपक्रम आहे. राज्याचे विधी व न्याय विभाग सचिव राजेंद्र भागवत यांच्या हस्ते आज (ता. ७) कल्याण आरटीओ कार्यालय परिसरात त्याचे उद्‌घाटन करण्यात आले.**

या वेळी 'नो हॉर्न प्लीज' उपक्रमाची माहिती आरटीओ अधिकारी संजय ससाणे यांनी दिली. भागवत यांनी कल्याण आरटीओ कार्यालयामार्फत वाहनचालक व नागरिकांना देण्यात येणाऱ्या विविध सुविधांची पाहणी करताना माहिती घेतली.



त्यांनी या उपक्रमाचे कौतुक करीत हॉर्नचे प्रदूषण रोखण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले. या वेळी कल्याण आरटीओ उपप्रादेशिक परिवहन अधिकारी संजय ससाणे, आय. एच. मासुमदार, मुंबई रिक्षामेन्स युनियन पदाधिकारी तंबी कुरियन, शिरीष नाईक, विविध रिक्षा संघटना पदाधिकारी, आरटीओ अधिकारी-कर्मचारी आदी उपस्थित होते. या उपक्रमाद्वारे जनजागृती करण्यासाठी विशेष क्लृप्त्यांचाही वापर केलेला दिसून आला. या वेळी अनेक रिक्षांच्या पाठीमागे 'नो हॉर्न प्लीज'चे स्टिकर लावण्यात आले होते. हॉर्नच्या अतिरिक्त आवाजाबद्दल निषेध व्यक्त करण्यासाठी एका रिक्षाला १५० हून अधिक हॉर्नने सजवण्यात आले होते.

# वेश्याव्यवसायप्रकरणी इंदापुरातील राष्ट्रवादीच्या नगरसेवकाविरुद्ध गुन्हा

**रायगड (प्रतिनिधी)-** इंदापूरमधील एका लॉजवर ग्रामीण पोलिसांनी छापा टाकून वेश्याव्यवसाय करणाऱ्या महिलांची सुटका केली. वेश्याव्यवसायात प्रकरणात राष्ट्रवादी काँग्रेसचा



नगरसेवक सामील असल्याचे निष्पन्न झाले असून वेश्याव्यवसायास प्रवृत्त केल्याप्रकरणी नगरसेवकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी इंदापूर नगरपालिकेतील राष्ट्रवादी काँग्रेसचा नगरसेवक अनिकेत अरविंद वाघ आणि लॉजचालक अजय बाळसाहेब शिंदे (दोघे रा. इंदापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. इंदापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सजन हंकारे यांनी या संदर्भात इंदापूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. ग्रामीण पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, इंदापुरातील खडकपुरा भागात असलेल्या रूपाली लॉजवर वेश्याव्यवसाय सुरू असल्याची माहिती पोलीस निरीक्षक हंकारे यांना मिळाली होती. राष्ट्रवादी काँग्रेसचा नगरसेवक- लॉजमालक वाघ आणि लॉजचालक शिंदे हे युवतींना पैशांचे आमिष दाखवून त्यांना वेश्याव्यवसायास प्रवृत्त करत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी शहानिशा केली. बनावट ग्राहकाच्या माध्यमातून खातरजमा करण्यात आल्यानंतर शुक्रवारी (६ एप्रिल) पोलिसांनी तेथे छापा टाकला. पोलीस निरीक्षक हंकारे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक ननावरे, खंडागळे, पोमणे, यांनी ही कारवाई केली.

# 'साक्ष बदलण्यासाठी सलमानकडून पैशांचे आमिष', भाजप नेत्याचा गंभीर आरोप

**इंदूर (वृत्तसंस्था)-** काळवीट शिकारप्रकरणी अटक करण्यात आलेला सलमान खानला २ दिवसात जामीन मंजूर झाला आणि सोशल मीडियावर विविध चर्चांना उधाण आले. आता भाजपचे नेते कैलाश विजयवर्गीय यांनी सलमान खानवर गंभीर आरोप केला आहे. सलमान खान पैशांच्या बळावर साक्षीदार खरेदी करण्याचा प्रयत्न करत होता, असा आरोप त्यांनी केला आहे. इंदूरमधील एका कार्यक्रमात बोलताना त्यांनी हे वक्तव्य केले आहे. यावेळी बोलताना विजयवर्गीय म्हणाले की,



'सलमान खानला अटक केल्यापासून टीव्हीवर सगळीकडे त्याच्याच बातम्या दाखवल्या जात आहे. सलमानने कोणते पुण्याचे काम केलेले नाही, कोणते चांगले काम केलेले नाही. त्याने काळवीटाची शिकार केली आहे आणि याबद्दल त्याला शिक्षाही सुनावण्यात आली आहे. बिश्नोई समाजाचे कौतुक करताना ते म्हणाले की, ज्या शेतकऱ्यांकडे २ एकर, ५ एकर शेती आहे त्यांनी सलमानविरोधात साक्ष दिली.

# दलित युवकांनीच रामदास आठवलेंवर फेकले काळे कपडे



**सूरत (पीटीआय)-** दलित बांधवांवर होणाऱ्या अन्यायाच्या घटना दिवसेंदिवस वाढत चालल्या आहेत. याविरोधात केंद्रीय मंत्री रामदास आठवले हे काहीच करत नाही, असं म्हणत काही दलित तरुणांनी रामदास आठवले मुर्दाबाद अशा घोषणा दिल्या. त्यांच्यावर काळे कपडे फेकले. दरम्यान या तरुणांना ताब्यात घेण्यात आलं आहे. देशात दलितांविरोधात अन्याय सुरू आहे. मात्र असे असले तरी आमचे नेते म्हणवणारे नेते मंत्री होऊन गप्प बसले आहेत. त्यांचा धिक्कार करत या दलित तरुणांनी पत्रकार परिषदेदरम्यान आक्रमक होत रामदास आठवले यांना काळे झेंडे दाखवले आणि काळे कपडे रामदार आठवले यांच्यावर फेकले.

# लैंगिक अत्याचाराबद्दल चौघांना जन्मठेप

**राधानगरी (हिंदुस्थान समाचार)-** तालुक्यातील कासारपुतळे गावातील अल्पवयीन



मुलीवर अत्याचार केल्याबद्दल दोषी ठरलेल्या चौघांना जन्मठेपेची शिक्षा झाली. पुणे जिल्ह्यातील मुलगा, त्याचे आई-वडील व एका महिलेचा समावेश आहे. जिल्हा व सत्र न्यायाधीश ए. यू. कदम यांनी ही शिक्षा सुनावली. सिंधू जालिंदर गायकवाड (वय ६२, रा. आंबळे, ता. पुरंदर), संतोष जालिंदर गायकवाड (वय ४०), जालिंदर बाळू गायकवाड (वय ६८), इंदुबाई भिकाजी भोसले (वय ६५, रा. मांडर, ता. पुरंदर) अशी शिक्षा झालेल्या आरोपींची नावे आहेत.

पीडित मुलीच्या वडिलांनी पोलिसात तक्रार दिली होती. पीडित मुलगी अल्पवयीन असून ती पालकांसोबत कासारपुतळे गावात राहात होती. आई रागावल्यामुळे १० नोव्हेंबर २०१४ रोजी मुलगी घरातून निघून गेली. १२ नोव्हेंबर रोजी ती आदमापूर (ता. भुदरगड) येथे संत बाळू मामा मंदिराच्या बाहेर बसली होती. त्या वेळी दर्शनासाठी आलेल्या जालिंदर गायकवाड व सिंधू गायकवाड यांनी तिला सांभाळतो असे सांगून आपल्या गावी आंबळे येथे नेले. संतोष गायकवाड याच्याबरोबर अल्पवयीन मुलीचे लग्न करून देण्याचा त्यांचा विचार होता.

# नियम मोडल्यास परवाना जप्त

**पुणे (अभिजीत येरल्लु)- सिग्नल वा वाहतुकीचे नियम मोडण्यात फुशारकी मारत असाल किंवा नियम मोडल्याने आपण अपेक्षित ठिकाणी लवकर पोचू, असा समज असेल, तर यापुढे तो दूर केलेलाच बरा. कारण यापुढे नियम मोडणाऱ्या वाहनचालकांना केवळ दंडच होणार नाही, तर वारंवार नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांचे परवानेही जप्त होणार आहेत.**

अशाच नियम मोडणाऱ्या तब्बल साडेसहा हजार वाहनचालकांचे परवाने वाहतूक शाखेच्या पोलिसांनी जप्त केले आहेत. वाहतुकीच्या नियमांचे सर्रासपणे व सातत्याने नियम मोडणाऱ्यांना जरब बसावी, यासाठी पोलिसांनी मागील वर्षीपासून सातत्याने नियम मोडणाऱ्यांचे परवाने जप्त करण्यावर अधिक भर दिला आहे. नियमांचे उल्लंघन करायचे आणि दंडाची रक्कम भरून निघून जायचे, ही मानसिकता वाहनचालकांमध्ये मोठ्या प्रमाणात आहे. ही मानसिकता बदलावी आणि भविष्यात त्यांनी नियमांच्या उल्लंघनाची चूक करू नये, यासाठी परवाने जप्त करून ते निलंबनासाठी पाठविण्यात येत असल्याचे पोलिसांनी




सांगितले. याबरोबरच वाहतुकीच्या नियमांचे सातत्याने उल्लंघन करणाऱ्यांपाठोपाठ मद्यपान करून वाहने चालविणाऱ्या आणि रिक्षा भाडे नाकारणाऱ्यांचे परवाने मोठ्या संख्येने जप्त करण्यात आले आहेत. प्रादेशिक परिवहन विभागाने (आरटीओ) हे परवाने माघारी (रिव्होक) घ्यावेत, यासाठी वाहतूक शाखेने सर्व परवाने त्यांच्याकडे पाठविले आहेत. त्यामुळे आता यापुढे आपल्याकडून वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन होणार नाही, याची काळजी वाहनचालकांना घ्यावी लागणार आहे.

